Notice is further given that pursuant to the Section 91 of the Companies Act, 2013 and the Rules framed thereunder, the Register of Members and the Share Transfer Books of the Company will remain closed from **Wednesday 28th June, 2023 to Tuesday, 4th July, 2023 (both days inclusive) for the purpose of the 62nd AGM and payment of the Dividend of Rs.15/- on the Equity Shares of the Company for the year ended 31st March, 2023**. The dividend if approved by the Members will be paid subject to the deduction of tax at source, on or after **Friday, 7th July, 2023** to those members whose names stand on the Register of Members of the Company, as on the cut-off date i.e. **Tuesday, 27th June, 2023**.

The above information is being issued for the information and benefit of all the Members of the Company and in compliance with the Circulars.

This information is also available on the Company's website at www.bomoxy.com and the website of the BSE Limited i.e. www.bseindia.com.

The Members may contact the Company's Registrar and Share Transfer Agent quoting the Folio Number/ DP ID and Client ID at:

TSR Consultants Private Limited
(Unit: Bombay Oxygen Investments Limited)
C-101, 1st Floor, 247 Park,
Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli (West),
Mumbai - 400 083
Tel: +91 810 811 8484
Email: csg-unit@tcplindia.co.in
Website: https://www.tcplindia.co.in

For **Bombay Oxygen Investments Limited**
Sangeeta Rohit Naik
Company Secretary
Place : Mumbai
Date : 2nd June, 2023

PUBLIC NOTICE

NOTICE IS HEREBY given under the instructions of my client that, as part of the negotiation process for purchase of the property described in the Schedule below ["said Property"] by my client, free from all encumbrances, claims and demands, I am investigating the title of Mr. Kamal Kuldipraj Kapoor to the said Property. All persons claiming or having any share, right, title, interest, demand or claim against or to the said Property or any part thereof, by way of mortgage, gift, sale, transfer, lease, sub-lease, assignment, license, tenancy, sub-tenancy, inheritance, covenants, lien, charge, trust, maintenance, easement, possession or otherwise howsoever are required to make the same known in writing along with the documentary evidence in that regard to the undersigned at his office at 59, Dr. V.B. Gandhi Marg, Fort, Bombay-400023 and by an email to the undersigned on email ID-amoltembe@gmail.com within 14 days from the date of publication hereof. Otherwise the transaction of purchase of the said Property will be completed without reference to such claim, and the same, if any, will be considered as waived.

SCHEDULE ABOVE REFERRED TO

40.10% undivided share in land admeasuring 1,334.45 square metres as per the Agreement in Form HH bearing Plot No. 370 of Suburban Scheme No. III of Chembur and bearing CTS No. 1372, 1372/1 to 3 of village Chembur along with bungalow named 'K

निवृत्तीनाथांच्या पालखीचे होणार जोरदार स्वागत

■ नाशिक

आषाढी एकादशीनिमित्त त्र्यंबकेश्वर येथून नाशिकमध्ये येणाऱ्या निवृत्तीनाथ महाराज पालखीचे व वारकऱ्यांचे स्वागत परंपरेनुसार करण्यात येणार आहे. याबाबत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा स्वागत समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. पालखीच्या प्रस्थानानंतर पहिला मुक्काम त्र्यंबकेश्वर येथेच आहे तर दुसरा मुक्काम सातपूर येथे होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी सकाळी ९ च्या सुमारास पंचायत समितीच्या आवारात पालखीचे आगमन होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राधाकृष्ण गमे, गंगाथरन डी, आशिमा मित्तल, मनपा आयुक्त, पोलिस आयुक्त शिंदे आदी उपस्थित राहणार आहेत.

नाशिकमध्ये पीओपी नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन

■ नाशिक

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींपासून होणारे जलप्रदूषण रोखण्यासाठी शासनाने या मूर्तींच्या निर्मितीला बंदी घातली आहे. या मूर्तींच्या आयातीवरही बंदी घातली असून, त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवली आहे. त्यानुसार महापालिकेने याबाबतचे मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून, पीओपी मूर्तींची आयात करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १५ मे २०२० च्या सुधारित नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नदीचे प्रदूषण व नुकसान टाळण्यासाठी केंद्र सरकारने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीवर बंदी जाहीर केली होती. या बंदीला न्यायालयात आव्हान दिल्यानंतर उच्च न्यायालयानेही बंदी कायम ठेवली. या पार्श्वभूमीवर पीओपीच्या मूर्ती निर्मिती, आयात बंदीबाबत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महासंचालकांना सूचित केले आहे. या मार्गदर्शिकेनुसार नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील मूर्तिविक्रेते, कारखाने, कारागीर, साठवणूक करणारे व्यापारी, दुकानदार इत्यादींना बंदीबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार होणाऱ्या कुठल्याही प्रकारच्या मूर्ती नदीपात्रात तसेच नैसर्गिक पाण्याच्या स्रोतात विसर्जित करू नये, असे सांगण्यात आले आहे. मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर नियमांनुसार कारवाई केली जाणार असल्याचेही महापालिकेने कळवले आहे.

कोल्हापुरात ४ ते ६ जूनला उपसाबंदी

■ कोल्हापूर

सध्या कोल्हापूर जिल्ह्यात पुन्हा एकदा उपसाबंदीचे आदेश देण्यात आले आहेत. ४ ते ६ जूनला उपसाबंदी असेल. पंचगंगा आणि भोगावती नदीच्या दोन्ही काठावर उपसाबंदी करण्यात आली आहे. वळीव पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावली असली, तरी जिल्ह्यात सर्वदूर दमदार सरी अजूनही कोसळल्या नसल्याने पाण्याचा प्रश्न बिकट होत चालला आहे. पावसाचे आगमन लांबल्यास जिल्ह्यामध्ये पाणीबाणी होण्याची दाट शक्यता आहे. जिल्ह्यातील प्रमुख आठ धरणांमध्ये जेमतेम पाणीसाठा आहे. नद्यांच्या पात्रांनी सुद्धा तळ गाठला आहे. कोल्हापूर जिल्ह्यात केवळ १५ ते २० दिवसांचा पाणीसाठा उपलब्ध आहे.

माणगंगा कारखाना निवडणुकीत ३७ वर्षांनंतर बिनविरोध सत्तांतर

शिवसेनेचा तानाजी पाटील गट सत्तेवर

■ कराड

सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील माणगंगा सहकारी साखर कारखान्यात तब्बल ३७ वर्षांनंतर सत्तांतर झाले आहे. या कारखान्यात प्रथमच लढणाऱ्या शिवसेनेच्या तानाजी पाटील गटाची बिनविरोध सत्ता आली. सांगोल्यातील शेकापचे नेते डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी पाटील यांना बिनशर्त पाठिंबा देत माघार घेतल्याने सत्ताधारी राजेंद्रअण्णा देशमुख गटानेही सर्व अर्ज माघारी घेण्याचा धक्कादायक निर्णय जाहीर केला आणि हा सत्तांतराचा चमत्कार घडला.

शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटातील जिल्हा बँकेचे संचालक तानाजी पाटील यांचे सर्व १७ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. भाजपचे नेते, माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख व त्यांचे बंधू अमरसिंह देशमुख यांच्या माघारीच्या नाट्यमय घडामोडींमुळे राजकारणात खळबळ उडाली आहे. हा कारखाना कर्जापोटी जिल्हा बँकेच्या ताब्यात आहे. त्याची निवडणूक प्रक्रिया १५ दिवसांपासून सुरू होती. बुधवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत अनेक खलबते झाली. सत्ताधारी गटाकडून सांगोला तालुक्यामधून शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या वतीने दाखल केलेले अर्ज सुरुवातीलाच मागे घेत पाटील गटाला बिनशर्त पाठिंबा देण्यात आला. सांगोला तालुक्यात सुमारे चार हजार मते असून, तेथील अर्ज मागे घेतल्यानंतर आटपाडीच्या देशमुखांनीही माघार घेत निवडणूक बिनविरोध केली. यावेळी तानाजी पाटील म्हणाले की, कारखान्याची निवडणूक प्रक्रिया सुरू असल्याचे आम्हाला उशिरा कळले. त्यामुळे अर्ज भरताना अडचणी आल्या. बिनविरोधसाठी सत्ताधारी गटाकडून प्रस्ताव आला होता. वरिष्ठ नेत्यांकडून दबावतंत्र वापरण्यात आले. मात्र, आम्ही निवडणूक लढवण्यावर ठाम होतो. साखर कारखाना खासगी होण्याच्या मार्गावर असून, तो सभासदांचा राहावा, यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचा विश्वास आम्ही नेत्यांना दिला. हीच भूमिका दिवंगत आमदार गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्याकडे मांडली असता त्यांनी बिनशर्त पाठिंबा दिला.

नाशिकच्या देवळा तालुक्यात राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी

■ नाशिक

कांद्यासह अन्य शेतमालाला भाव मिळत नसल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी आता राजकीय पुढाऱ्यांना गाव बंदीचा निर्णय घेतला आहे. नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील एका ग्रामपंचायतीने त्याबाबतचा ठराव केला आहे. यामुळे आगामी काळात कांद्याचा दरासाठी शेतकरी आणखी आक्रमक होणार अशी शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून कांद्याचे दर पडले असून २ रुपये ते ६ रुपये प्रतिकिलो सरासरी कांद्याला भाव मिळत आहे. कांदा उत्पादनाचा खर्च देखील निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांश जिल्ह्यात शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन छेडत सरकारकडे कांद्याला दराची मागणी करीत आहेत. नाशिकच्या देवळा तालुक्यातील दहिवड ग्रामपंचायतीनेही ग्रामसभा घेत गावात राजकीय पुढाऱ्यांना गावबंदीचा ठराव मांडला. हा ठराव ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर गावात 'पुढाऱ्यांना गावबंदी' असा फलक लावण्यात आला. जिल्हयातील अनेक ठिकाणी आता राजकीय पुढाऱ्यांना गावबंदीचे फलक लावण्यास यापूर्वीपासूनच सुरुवात झाली आहे.

'शासन आपल्या दारी'चा पिंपरी महापालिकेत प्रारंभ

■ पिंपरी

शासकीय योजना लोकाभिमुख करून त्याची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी 'शासन आपल्या दारी, जत्रा शासकीय योजनांची, सर्वसामान्यांच्या विकासाची' या अभियानाचा प्रारंभ महापालिकेत करण्यात आला.

पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे कार्यक्रम झाला. महापालिकेच्या समाज विकास विभाग अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून महिला बालकल्याण विभाग या योजनेअंतर्गत १६४ विधवा महिलांना पंधरा हजार रुपये व मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत मुलींसाठी सायकल या योजनेअंतर्गत शंभर मुलींना सात हजार रुपये रकमेचा ऑनलाइन लाभ अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील आणि उप आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सविता आगरकर, संतोषी चोरघे, लिपिक रोहित साळवी, प्रज्ञा कांबळे, महेंद्र गायकवाड, जयेश खताळ, अनिकेत सातपुते, कल्पना मदगे, मनीषा भुजबळ या कार्यक्रमाला उपस्थित होते.

महाविकास आघाडीने पालिका निवडणूक एकत्र लढल्यास ठाकरे गटाचा शंभर जागांवर दावा?

■ मुंबई

आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. त्या अगोदर ऑगस्ट महिन्यानंतर मुंबई पालिका निवडणूक लागण्याची शक्यता आहे. या पालिका निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र आल्यास उद्धव बाळासाहेब ठाकरे गट शंभर जागांवर दावा करणार असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली.

यंदाच्या मुंबई पालिका निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र आल्यास जागावाटप व प्रभाग रचनेबाबत राजकीय समिकरणे बदलणार आहेत. मुंबईसह उपनगरातील जोगेश्वरी (पूर्व), खार-वांद्रे (पूर्व), दहिसर, भांडूप (पश्चिम), विक्रोळी, पवई, साकीनाका, माहीम, धारावी, दादर (पश्चिम), वरळी, काळाचौकी, शिवडी, परळ या पालिका मतदारसंघात ठाकरे गटाचे वर्चस्व आहे. यात अनेक जुन्या नगरसेवकांची निवडून येण्याची क्षमता आहे. अशांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता आहे. तर कमकुवत नगरसेवकांना डच्चू मिळणार असल्याचे बोलले जाते. त्यासाठी ठाकरे गटाकडून नवीन चेहऱ्याची चाचपणी करण्यात येत आहे. पालिका निवडणुकीत आपले बालेकिल्ले सर करण्यासाठी ठाकरे गटाने कंबर कसली आहे.

पुणे सोलापूर महामार्गावर अपघात! वाहतूक ठप्प

■ पुणे

पुणे सोलापूर महामार्गावर ट्रकचा भीषण अपघात झाला. या अपघातामुळे महामार्गावर वाहतूक ठप्प झाली असून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांचा खोळंबा झाला. या महामार्गावर चालकाचा वाहनावरचा ताबा सुटल्याने ट्रक डिवायडरवर धडकला. हा ट्रक मालाने भरलेला असल्याने मोठा अपघात झाला.

सोलापूर जवळील बाळे ब्रीजजवळ ही घटना घडली. या अपघातानंतर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली.

भाईंदरमध्ये महिलेचा शिर नसलेला मृतदेह

■ भाईंदर

भाईंदर पश्चिममध्ये एका बॅगेत शीर नसलेला महिलेचा मृतदेह आढळला. या घटनेने भाईंदर मोठी खळबळ उडाली आहे. भाईंदर पश्चिममधील उत्तन या समुद्र किनाऱ्यावर ही बॅग आढळून आली. सकाळी ८ च्या सुमारास ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच उत्तन सागरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बॅगेची तपासणी केली. २५ ते ३० वर्ष वयोगटातील महिलेचा मृतदेह असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तवला. या मृत महिलेच्या हातावर त्रिशूळ व ओमचा टॅटू आहे. बॅग वाहून आलेली असून नेमकी कुठून आली आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.

मोपा विमानतळावर मद्य दुकानांना स्थानिक मद्यविक्रेत्यांचा विरोध

■ पणजी

गोव्यातील मोपा विमानतळावर किरकोळ दारू दुकाने सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरोधात स्थानिक मद्यविक्रेत्यांच्या असोसिएशनने विरोध केला आहे. परवाना देण्याच्या कायद्यात बदल करून मुंबईच्या एका व्यावसायिकाला दुकान सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे, असा असोसिएशनचा आरोप आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी अबकारी आयुक्त नारायण गाड यांची भेट घेतली. मोपा व दाबोळी विमानतळांवर मद्यदुकानांना परवाना देण्यासंदर्भात विचार सुरू आहे का, असे विचारले असता त्यांनी याबाबत काहीच माहिती उपलब्ध नसल्याचे संगितले. त्यावेळी विमानतळांवर मद्यविक्रीची परवानगी दिल्यास राज्यातील घाऊक तसेच किरकोळ मद्यविक्रेत्यांवर मोठा परिणाम होणार असल्याने परवानगी दिली जाऊ नये अशी मागणी केली. संघटनेचे अध्यक्ष दत्तप्रसाद नाईक म्हणाले की, गोव्यात काही भागात मद्यविक्रीला बंदी आहे. परंतु आता लवकरत तशी परवानगी देणारी अधिसूचना येणार आहे, असे कळते. मुख्यमंत्र्यांना तशी परवानगी द्यायची असल्यास ते देऊ शकतात. परंतु याचा फटका स्थानिक मद्यविक्रेत्यांना बसेल, जे बहुतांशी ओबीसी आणि अल्पसंख्याक समाजातील आहेत. गोवा हे पर्यटन राज्य असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. राज्यातील मद्यव्यवसाय हा पूर्णपणे पर्यटकांवर अवलंबून आहे. राज्यात सीलबंद मद्य बाटल्यांची विक्री करणारे सुमारे ३०७६ विक्रेते आणि दुकाने आहेत. रेस्टॉरंट्स व हॉटेल्समध्ये मद्यविक्री करणारे सुमारे ७९९८ परवानाधारक आहेत. विमानतळावर मद्य दुकाने सुरू केल्यास गोव्यातून जाणारे पर्यटक विमानतळावरच मद्य बाटल्या खेरदी करतील. त्याचा फटका अन्य मद्यविक्रेत्यांना बसेल.

१ जुलै पासून कर्नाटकमध्ये रेशनवर मिळणार मोफत धान्य

■ बंगळुरू

कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात बीपीएल धारकांना रेशनवर मोफत धान्य देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार राज्यात काँग्रेसची सत्ता येताच दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करायला सरकारने सुरुवात केली आहे. त्यानुसार ११ जूनपासून राज्य परिवहन मंडळांच्या बसेस मधून महिलांना मोफत प्रवासाची मुभा देण्यात आली आहे. तर बीपीएल कार्डधारकांना रेशनवर १० किलो मोफत धान्य देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

माजी राज्यमंत्र्यांच्या मुलाची ताडोबा व्याघ्र प्रकल्पात फसवणूक

■ चंद्रपूर

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वनपर्यटनासाठी ४० हजार रुपये शुल्क आकारून एका व्यक्तीने माजी राज्यमंत्री गुलाबराव गावंडे यांचा मुलगा पंकज गावंडे व अन्य चार मित्रांची फसवणूक केली. याची तक्रार क्षेत्र संचालक तथा मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांच्याकडे करण्यात आली आहे. यानंतर ताडोबा व्यवस्थापनाने चौकशी सुरू केली आहे. पंकज गावंडे व त्यांचे मित्र प्रवीण जगन्नाथ कुचर, अभिजीत नंदकिशोर मुळे, प्रवीण अनंतराव सावळे व कुणाल पंजाबराव काळे असे पाच जण २९ व ३० मे रोजी पर्यटनासाठी गेले होते.

बँकेच्या सीडीएम मशीनमध्ये आढळल्या ५०० च्या बनावट नोटा

■ जळगाव

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील चोरवड येथील एका राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेतील सीडीएम मशिनमध्ये खातेदाराने भरलेल्या पाचशेच्या सहा नोटा बनावट निघाल्याने खळबळ उडाली. याप्रकरणी पारोळा पोलिसांत एका खातेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पारोळा येथील एचडीएफसी बँक शाखेचे व्यवस्थापक जितेंद्र किशोर खरे यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. २९ मे रोजी सायंकाळच्या सुमारास तालुक्यातील चोरवड पारोळा येथील राजू आत्माराम पाटील हे बँकेच्या कॅश डिपॉझिट मशिनद्वारे आपल्या खात्यात भरणा करण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी पाचशे रुपयांच्या सहा नोटा सीडीएम मशिनमध्ये भरल्या. परंतु या नोटा खोट्या व बनावट असल्याने त्या खात्यात न जमा होता सीडीएमच्या कॅसेटमध्ये जमा झाल्या. दरम्यान, बँकेचे कॅशिअर तुषार जोशी व रमेश सपकाळे यांनी तपशील तपासला असता या नोटा बनावट आढळून आल्या. नोटा जमा करणाऱ्या खातेदाराचा खाते क्रमांक तपासला असता तो चोरवड येथील राजू आत्माराम पाटील यांचा निघाल्याने त्यांना बँकेत बोलावून हा प्रकार सांगितला. दरम्यान, पाटील यांनी पैसे भरल्याचे कबूल केले असून, बनावट नोटा आढळल्याप्रकरणी पारोळा पोलिसात राजू पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोल इंडियाच्या समभाग विक्रीला लक्षणीय प्रतिसाद

■ मुंबई

केंद्रातील मोदी सरकारने कोल इंडियाच्या समभाग विक्रीचा निर्णय झाल्यानंतर या प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी लक्षणीय प्रतिसाद नोंदविला. काल पहिल्याच दिवशी तब्बल ६५०० कोटी रुपयांच्या बोली लावण्यात आल्या. काल आणि आज होणाऱ्या ओएफएस अंतर्गतच्या समभाग विक्रीमध्ये १८.४८ कोटी समभागांच्या तुलनेत गुंतवणूकदारांनी २८.७६ कोटी समभागांची मागणी केली आहे. त्यामुळे सरकार आणखी समभाग विकण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे. कालच्या प्रक्रियेतील बहुतेक बोली २२६ रुपये प्रति शेअर होत्या, ज्या ओएफएससाठी सरकारने निर्धारित केलेल्या २२५ रुपयांच्या किमतीपेक्षा किंचित जास्त आहेत. गेल्या वर्षभरात सरकारी मालकीच्या खाण कामगारांच्या समभागांनी सरासरी २२० रुपयांच्या किमतीत व्यवहार केले आहेत, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सरकारने ऑफर फॉर सेल अंतर्गत संस्थागत गुंतवणूकदारांना ८.३१ कोटी पेक्षा जास्त शेअर्स ऑफर केले आहेत, परंतु २८.७५ कोटी शेअर्ससाठी ३.४६ पट बोली मिळाल्या आहेत.

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. ट्यूब इन्व्हेस्टमेन्ट ऑफ इंडिया लि.च्या वह्यांमध्ये पार्वती वसंत धारावत आणि अजय वसंत धारावत यांच्या नावे असलेल्या डिस्टिंक्टीव्ह क्र. १८६५३७०९१ पासून १८६५३७७५० पर्यंत धारण केलेल्या ६६० समभागांकरिता भाग प्रमाणपत्र क्र. २३७८६ आणि फोलियो क्र. टीआयएल००२३७८६ हरवले/गहाळ झाले आहे आणि जाहिरातदाराने कंपनीस त्याबदल्यात दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करण्याकरिता अर्ज केला आहे. कोणा व्यक्तीचे सदर समभागांवर दावे असल्यास ते दावे कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट केफिन टेक्नोलॉजीस लि., सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१-३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद ५०० ०३२ यांच्याकडे सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावे असे न केल्यास कंपनी सदर समभागांच्या संदर्भात दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याची प्रक्रिया सुरु करेल.

सही/-
भागधारकांचे नाव
१. पार्वती वसंत धारावत
२. अजय वसंत धारावत

दिनांक: ०३.०६.२०२३
ठिकाण: मुंबई

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडच्या वह्यांमध्ये पार्वती वसंत धारावत आणि अजय वसंत धारावत यांच्या नावे असलेल्या डिस्टिंक्टीव्ह क्र. १८६५३७०९१ पासून १८६५३७७५० पर्यंत धारण केलेल्या ६६० समभागांकरिता भाग प्रमाणपत्र क्र. २३७८६ आणि फोलियो क्र. टीआयएल००२३७८६ हरवले/गहाळ झाले आहे आणि जाहिरातदाराने कंपनीस त्याबदल्यात दुय्यम भाग प्रमाणपत्रे पारित करण्याकरिता अर्ज केला आहे. कोणा व्यक्तीचे सदर समभागांवर दावे असल्यास ते दावे कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट केफिन टेक्नोलॉजीस लि., सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र. ३१-३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद ५०० ०३२ यांच्याकडे सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत दाखल करावे असे न केल्यास कंपनी सदर समभागांच्या संदर्भात दुय्यम भाग प्रमाणपत्र पारित करण्याची प्रक्रिया सुरु करेल.

सही/-
भागधारकांचे नाव
१. पार्वती वसंत धारावत
२. अजय वसंत धारावत

दिनांक: ०३.०६.२०२३
ठिकाण: मुंबई

जाहीर सूचना

श्री. अरविंद आर. जानी आणि सौ. नयना ए. जानी हे संस्कृती बिल्डींग १ ते ४ को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., पत्ता - ९० फूट रोड, सें. लॉरेन्स हायस्कूलसमोर, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पू), मुंबई ४००१०१ चे सदस्य आणि इमारत क्र. ३ मधील सदनिका क्र. ५०३ चे सह-धारणकर्ते यांचे अनुक्रमे दि. ०२.०१.२०१९ आणि १०.०४.२०२२ रोजी कोणतेही नामनिर्देशन न करता निधन झाले.

संस्था याद्वारे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदार / आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचनेच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये, संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या/ आक्षेपांच्या समर्थनार्थ कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, दावे किंवा आक्षेप मागवित आहे. वर विहीत केलेल्या कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/ आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल / मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंधांबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील दिवंगत सदस्याचे सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यास दावे/ आक्षेप, जर असल्यास, संस्थेस प्राप्त झाल्यास त्याबाबत संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार केला जाईल. संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधीची प्रत दावेदार / आक्षेपदारांना पाहण्याकरिता संस्थेच्या कार्यालयात / संस्थेच्या सचिवांकडे सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीच्या दिनांकापर्यंत सायं. ७.३० ते रात्री ९.०० या वेळेत उपलब्ध असेल.

दि संस्कृती बिल्डींग १ ते ४ लि. सीएचएस लि.
करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०३.०६.२०२३

महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

शॉर्ट ई - निविदा सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-२६ आणि टी-२७/(२०२३-२४) अशा दोन निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. ०३.०६.२०२३ पासून ते दि. ०७.०६.२०२३ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. ०८.०६.२०२३ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

सही/-
कार्यकारी अभियंता (स्था.)
स्थापत्य विभाग, भांडुप

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
ई-निविदा सूचना क्र. ०८ सन २०२३-२४
शुध्दीपत्रक

वाढीव अंबरनाथ-बदलापूर पाणी पुरवठा योजने अंतर्गत अंबरनाथ व बदलापूर शहरामध्ये विविध ठिकाणी उंच जलकुंभ बांधणे व तद्नुषंगिक गुरुत्व वाहिन्या / उर्ध्ववाहिन्या पुरविणे, अंथरणे व कार्यान्वित करणे या कामाच्या ई निविदा म.जी. प्रा. कडून मागविण्यात येत आहे. या कामाची अंदाजित किंमत रु. १५,८७,९३,४२१/- (पंधरा कोटी सत्त्याऐंशी लक्ष त्र्याण्णव हजार चारशे एकवीस मात्र) आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.०५/०६/२०२३ पासून www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

ठिकाण - अंबरनाथ
दिनांक - २९/०५/२०२३
क्रमांक: आरओसी-२०२३-२४/क्र.-५/सी११५७

सही/-
कार्यकारी अभियंता,
म.जी.प्रा.ज.व्य.वि. अंबरनाथ

ई-लिलाव - जाहीर सूचना
डिडवानिया स्पिनिंग मिल्स प्रा. लि. (परिसमापनामध्ये)
सीआयएन: U17200MH2013PTC239833

सर्वसाधारण जनतेस नादारी आणि दिवाळखोरी संकेत २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या विनियमांच्या अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येते की, डिडवानिया स्पिनिंग मिल्स प्रा लि. (परिसमापनाअंतर्गत) ("डीएसएमपीएल") खालील तक्त्यामध्ये नमूद केलेली उपलब्ध पर्यायांद्वारे विक्री न होणाऱ्या संपत्ती ("एनआरआरए") ई-लिलावाद्वारे वितरित करण्यात येतील. भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन २०१६ च्या परिशिष्ट। सह वाचावयाच्या विनियमन ३७ए अन्वये या वितरण किंवा हस्तांतरणाकरिता संभाव्य गुंतवणुकदारांकडून बोली /प्रस्ताव मागविण्यात येत आहे. डीएसएमपीएलची संपत्ती "जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे तत्त्वावर, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" वितरित / हस्तांतरित करण्यात येणार आहे.

अ. क्र.	एनआरआरए आणि प्रक्रियेचा संक्षिप्त तपशील	रक्कम कोटींमध्ये
१.	एनआरआरए मालमत्तेचे निश्चित करण्यात आलेले एकूण मूल्य ज्यामध्ये एनआरआरए म्हणून विचारात घेतलेले अनरिअलाईझ्ड ऋणको, आकस्मिक किंवा विवादित संपत्ती आणि संकेताच्या कलम ४३ ते ६६ अन्वये मालमत्ता अंतर्निहित कार्यवाही ज्याकरिता माननीय एनसीएलटी मुंबई खंडपीठासमक्ष अपवर्जन आणि ऋणको अर्ज दाखल करण्यात आले आहेत, (एक ब्लॉक म्हणून प्रस्तावित) समाविष्ट आहे. (सदर प्रस्तावाचा संपूर्ण तपशील आणि अटी व शर्ती प्रोसेस इन्फोर्मेशन मेमोरेंण्डम (पीआयएम) दि. १५.०४.२०२३ मध्ये सादर केल्यानुसार आहे, जे परिसमापकाकडे आणि वेबसाईट www.didwaniaspinningmills.co.in मध्ये उपलब्ध आहे)	१३.०६
२.	ईएमडी /बोली सादर करते समयी भरणा	शुन्य

अर्ज करायचा अंतिम दिनांक: १६ जून, २०२३	परिसमापकाच्या कार्यालयात पाहणी: पूर्व परवानगीने १५ जून,२०२३ पर्यंत
बोलींचे सादरीकरण: १८ जून, २०२३	ई-लिलावाचा दिनांक: २० जून, २०२३ रोजी दु. २.३० वाजता

परिसमापक त्यांच्या संपूर्ण अधिकारामध्ये पीआयएममध्ये समाविष्ट कोणतीही माहिती, प्रस्ताव किंवा अटी आणि शर्ती सुधारणा, रद्द, अद्ययावत, दुरुस्ती, किंवा पूरक करु शकतात. या प्रक्रियेमध्ये अशा कोणत्याही पुढील सुधारणांकरिता जाहीर सूचना फक्त वरील वेबसाईट पानावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि इच्छुक पक्षकारांनी या वेबसाईटमध्ये प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या उद्घोषणांकरिता स्वतःला अद्ययावत करावे आणि त्याकरिता कोणतेही कागदी प्रसिद्ध करण्यात येणार नाही. कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता तुम्ही परिसमापकास त्यांचा ईमेल पत्ता: didwania.inliquidation@gmail.com किंवा दूरध्वनी क्र. ७०२१२७६४८८ येथे संपर्क साधावा.

संपत्ती - अन रिअलाईझ्ड बुक डेब्ट्स, अन्य करंट असेट्स आणि कलम ४३ आणि ६६ अंतर्गत दाखल अर्जाच्या अंतर्निहित प्रक्रियेच्या वितरण किंवा हस्तांतरणाकरिता करारपत्राच्या अटी आणि शर्ती हिस्सेधारक सल्लागार समितीसह सल्लामसलतीनंतर निश्चित करण्यात येतील आणि त्या निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन असतील.

सही/-
श्रीकांत मदनलाल झावर
डिडवानिया स्पिनिंग मिल्स प्रा. लि. (परिसमापनामध्ये) वे परिसमापक
IBBI/IPA-001/IP-P00156/2017-2018/10325
पत्ता: सी-११०१, कनाकिया सेव्हन्स, साग बाग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९.
नोंद. ईमेल: shrikantzawar1@yahoo.co.in
मोबा. क्र.: ७०२१२७६४८८

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०३.०६.२०२३

बृहन्मुंबई महानगरपालिका
एल.टी.एम.जी. रुग्णालय, सायन, मुंबई - ४०० ०२२
क्र. एलटीएच/०३१/टी दि. २.०६.२०२३

ई-निविदा सूचना

ही ई-निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालि